

श्री विठ्ठलगंगा फार्मर्स प्रोड्युसर कंपनीच्या वतीने आयोजित चर्चासत्रात डॉ. आर. जी. सोमकुँवर यांनी मार्गदर्शन केले.

# द्राक्षाच्या उत्पादवाढीसाठी 'कॅनॉपी' कडे द्या लक्ष

## डॉ. आर. जी. सोमकुँवरः निमगावला द्राक्षाच्या एप्रिल छाटणीवर चर्चासत्र

**अॅग्रोवन वृत्तसेवा**

सोलापूर : द्राक्षाच्या दर्जेदार आणि भरघोस उत्पादनासाठी 'कॅनॉपी' व्यवस्थापनाला महत्त्व आहे. त्यामुळे छाटणी करतानाच काड्यांची संख्या, जाडी, पानांचा आकार, संख्या याबाबतचे सूक्ष्म नियोजन होणे आवश्यक आहे. या पद्धतीमुळे बागेत सूर्यप्रकाश सर्वत्र खेळता राहतो, झाडांची वाढ योग्य पद्धतीने होते, अर्थात, पुढे त्याचा परिणाम उत्पादनवाढीवर होतो, असे मत राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्राचे संचालक डॉ. आर.जी. सोमकुँवर यांनी रविवारी (ता.१) व्यक्त केले.

माढा तालुक्यातील निमगाव (टें) येथील विठ्ठलगंगा फार्मर्स प्रोड्युसर कंपनीच्या प्रक्षेत्रावर द्राक्षाचे एप्रिल छाटणीचे व्यवस्थापन या विषयावर श्री. सोमकुँवर बोलत होते. अध्यक्षस्थानी माढा वेल्फेअर फाउंडेशनचे अध्यक्ष तसेच कंपनीचे चेअरमन धनराज शिंदे होते. द्राक्ष संशोधन केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. निशांत देशमुख, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाळासाहेब शिंदे, मंडळ कृषी अधिकारी संजय पाटील, प्रोड्युसर कंपनीचे व्हाइस चेअरमन श्रीकांत पाटील, संचालक पोपट खापरे, नितीन कापसे, महेश मारकड, महेश डोके, प्रशासकीय अधिकारी राहुल वरपे उपस्थित होते. डॉ. सोमकुँवर म्हणाले, की संजीवंकाचा उत्तम परिणाम साधण्यासाठी त्यांचा वापर बागेतील वातावरणाचा अभ्यास करूनच करावा, छाटणी करण्यापूर्वी बागेतील मातीचे परीक्षण करूनच शिफारसीत खतांच्या मात्रा द्याव्यात, तरच शाश्वत उत्पादनाबरोबरच खर्चात बचत करणे शक्य होईल. द्राक्षामध्ये मालाच्या तोडणी नंतर करण्यात येणाऱ्या खरड (एप्रिल छाटणी) छाटणी शास्त्रीय पद्धतीने होणे जरुरीचे आहे.

वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. देशमुख म्हणाले, की द्राक्षावरती होणारे नवनवीन संशोधन आणि उपलब्ध शास्त्रीय माहिती शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहाचवण्यासाठी द्राक्ष संशोधन केंद्र नेहमीच प्रयत्नशील असते. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शिंदे यांनीही मार्गदर्शन केले.